# जगभराच्या सूनग्रस्त सासवांनो, एक व्हा!



निरंतर
• चन्नवीर मठ
98507 01411

**घ**रात मला सर्वांत शेवटी आंघोळ करावी लागते. नेमकी त्याच वेळी लाईट जाते. मला थंड पाण्यानेच आंघोळ करावी लागते. सूनबाई मुद्दाम माझ्यासाठी पाणी ठेवत नाही...मला मोठा आवाज सहन होत नाही हे माहीत असल्याने ती टीव्हीचा आवाज मोठा करून रिमोट लपवून ठेवते...

सकाळी मुलांच्या शाळेची गडबड असते. मुलांचा डबा झाल्यानंतर स्वत:साठी भाजी काढून भांड्यात मीठ आणि तिखट घालून ठेवते. ही माहिती मुलाला सांगितल्यानंतर तो भाजी मस्त झाली होती म्हणत मलाच डाफरतो...

मला शुगर आहे. पाहुणे घरी आल्यानंतर मला हमखास गोड चहा देते..

तुमच्या साऱ्या जुनाट सवयी, त्यामुळे ह्यांना करिअरमध्ये डेव्हलप व्हावे असे वाटत नाही. चार पैसे अधिक कमविण्याची जिद्द नाही...

बाळाला शिऊ नका, त्याचा पापा घेऊ नका, तुमच्या तोंडाचा वास येतो, तुम्ही वापरलेला ग्लास त्याला देऊ नका...

मला एसी सहन होत नाही...अस्थमाचा त्रास आहे, मात्र बाईसाहेबांना एसीशिवाय एक क्षणही जमत नाही...तर खुशाल व्हरांड्यात झोपण्याचा सल्ला देते.

पैसे हरवल्याची व ते पैसे सासूनेच चोरल्याची (घेतल्याचा संशय नव्हे तर खात्री) तक्रार सार्वत्रिक स्वरूपाची म्हणावी अशीच.

अगदी सकाळच्या चहापासून ते रात्री झोपताना औषध घेण्यासाठी हव्या असलेल्या पाण्यापर्यंत आपली सून आपल्याला पदोपदी छळत असल्याचे सासवांचे म्हणणे आहे.

या प्रतिक्रिया प्रातिनिधिक आहेत.

आपल्या सुनेकडून शिवीगाळच नव्हे तर अगदी मिळेल त्या साधनाने मारहाणही होते, अशा करुण कहाण्याही येथे सांगितल्या जात आहेत. काही ठिकाणी सुनेच्या या पराक्रमात मुलगाही सहभागी असल्याचा आवर्जून उल्लेख केलेला आढळतो. या प्रतिक्रिया आहेत सुनेकडून होणाऱ्या कायदेशीर, शारीरिक आणि मानसिक छळाचा बळी ठरलेल्या सासवांच्या.. व्यासपीठ आहे : 'ऑल इंडिया मदर इन लॉ प्रोटेक्शन फोरम'

आता काय आहे 'ऑल इंडिया मदर इन लॉ प्रोटेक्शन फोरम'? हा प्रश्न आपल्याला पडला असेल.'एआयएमपीएफ'या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सुनांच्या छळाचा बळी ठरलेल्या सासवांची ही संघटना. या संघटनेची स्थापना बंगळुरूमध्ये याच महिन्यात म्हणजे सप्टेंबरमध्येच झाली आहे. ६ सप्टेंबर ०९ रोजी स्थापन झालेली ही केवळ भारतातील नव्हे तर जगातील पहिलीच सासूंची संघटना आहे, ज्या आपल्या सुनांच्या छळाचा बळी ठरल्या आहेत. स्थापनेच्या केवळ पहिल्या आठवड्यात भारतातील कोलकाता, मुंबई, नवी दिल्ली, जयपूर, रांची यांसारख्या शहरांसह पुणे, नागपूर, इंदौर आणि सोलापूरसारख्या दुसऱ्या क्रमांकाच्या शहरांतूनही मिळालेला प्रतिसाद थक्क करणारा आहे. इतकेच नव्हे तर परदेशातील अनेक पीडित सासवांनीही संपर्क साधला आहे.

या अनोख्या संस्थेची प्रसारमाध्यमांनी दखल न घेतली तरच नवल! देशांतर्गत माध्यमांसह परदेशी वाहिन्यांनी (आंतरराष्ट्रीय वाहिन्यांनी) या संघटनेला ठसठशीत प्रसिध्दी दिली आहे. लंडन बीबीसी, गल्फ टाइम्स,आयरिश टाइम्स, न्यूयॉर्क टाइम्स, बोस्टन पोस्ट, रशियन टीव्हीसारख्या मीडिया हाऊसनी कव्हर केले आहे. म्हणूनच जगभरातून चौकशीचे फोन येत आहेत.

आपल्या देशातील काही कायदे एकतर्फी आहेत किंवा एखाद्याच समाजघटकाला पूरक अशा स्वरूपाचे आ-हेत. याचे खास उदाहरण म्हणजे हुंडाविरोधी कायदा होय. हुंडाविरोधी कायद्यान्वये केवळ सुनेची बाजू न्याय्य मानली जाते. सासू म्हणजे भांडकुदळ, पाशवी, मनात सतत कपट असलेली, सुनेचा छळ करणारी, थोडक्यात खलनायिका अशीच रंगवली जाते.

सुनेसह आपल्या मुलाला त्रास होणार असल्याने किती आया कायद्याचा आधार घेणार? हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. यासंदर्भात आईच्या काळजाची गोष्ट स्मरते. म्हणे प्रेयसीच्या हट्टाखातर आईचाच खून करून पळून जात असताना मारेकरी मुलगा पडतो. त्याच्या हातातील आईचे काळीजही पडते. मुलगा पडल्याचे कळताच आईच्या काळजाला वेदना होतात. बाळ तुला लागलं का रे? असे काळजीयुक्त चौकशीचे स्वर आईच्या काळजातून त्या मुलाच्या कानी पडतात. मग त्याला आपल्या जन्मदात्रीला मारल्याबद्दल पश्चात्ताप होतो.

अनेक शासकीय रुग्णालयांतही या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. आजारी अवस्थेतील वृद्धांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यासाठी आलेले नातेवाईक दोन दिवसांनी गायब होतात. डिस्चार्ज झाल्यानंतरही त्या वृद्धांना घरी नेण्याची त्यांची मानसिकता नसते. काही महाभाग तर ॲडमिट करतानाच चुकीचा पत्ता देतात. प्रशासनाकडून काही प्रयत्न झाले तरी पत्ता न मिळाल्याने त्या रुग्णांना घरी पोचविता येत नाही. शिवाय रुग्णालयातही ठेवता येत नाही. या रुग्णांना कसे पाठवायचे हा प्रश्न निर्माण होतो की ज्याचे उत्तर सापडणे कठीण असते. मग त्या वृद्धांच्या अवहेलनेला मर्यादाच उरत नाही.

'एआयएमपीएफ'चा माध्यमांवर आक्षेप आहे. त्यातही दूरचित्र वाहिन्यांकडून फॅमिली ड्रामाच्या नावाखाली सासवांचे विद्रुपीकरण झाले. कौटुंबिक संघर्षाचे दळण दळणाऱ्या मालिकांमधून सासूंचे चारित्र्यहननच करण्यात येत आहे. तर सासरच्या मंडळीविरोधात सुनेने केलेल्या कोणत्याही तक्रारीला ठसठसीत प्रसिध्दी देणारी माध्यम दुसरी बाजू छापत नाहीत, अशी खंत या संघटनेची आहे. सुनेप्रमाणे सासूंनाही कौटुंबिक सुरक्षा मिळण्यासाठी कायद्याची गरज आहे.शिवाय हुंडाविरोधी कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याबाबत दै.'एकमत'शी बोलताना संयोजिका नीना धुलिया म्हणाल्या की, सुनेकडून सासवांचा होणारा छळ बंद दाराआडच दबून जातो. सासवांच्या किरकोळ कटकटीचाही सुना बाऊ करतात, कायद्याच्या आधाराने सासवांना वेठीस धरतात. सासवांवर सुनांकडून होणारे बहुतेक खटले केवळ सूड उगविण्याच्या हेतूनेच झालेले असतात असेही त्यांनी सांगितले. संघटनेच्या सहअध्यक्षा ममता नाईक यांनी समाजात सासवांची प्रतिमा डागाळण्यात 'सास बहू फेम' दैनंदिन मालिका जबाबदार असल्याचे म्हटले आहे.

संघटनेच्या कामाच्या स्वरूपाविषयी बोलताना त्या म्हणाल्या की, शोषणग्रस्त सासूमध्ये जागृती निर्माण करण्याला प्राधान्य आहे. शिवाय वाहिन्यांच्या निर्माते, दिग्दर्शकांना सासूंची प्रतिमा बदलण्यासाठी प्रयत्न करणे, आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी उतरत्या वयातही समाजासमोर येण्याचा आत्मविश्वास सासूमध्ये निर्माण करण्याचा आ-पला प्रयत्न राहील असेही त्यांनी सांगितले. आपला संघर्ष सामाजिक, कायदेशीर आणि मानसिक पातळीवर असल्याचेही त्या म्हणतात.

नीना धुलिया यांच्यासह सुनांच्या बनावट खटल्याला तिघा सासूंनी एकत्र येऊन ६ सप्टेंबर रोजी ही संघटना सुरू केली. या संघटनेत डॉक्टर, वकील, शिक्षिका, प्राध्यापिका यांच्यासह अनेक उच्चशिक्षित महिलांचा समावेश आहे. सुनांकडून होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक छळाचा शिकार झालेल्या या पन्नास जणींच्या पुढाकारानेच ही संघटना अस्तित्वात आल्याचे सांगण्यात येते. या संघटनेत सुमारे ७०० महिलांनी सहभाग नोंदविला आहे. यातील बहुतांश महिलांनी सुना आणि तिच्या माहेरच्या मंडळींकडून आपल्यावर खोटे आरोप होत असल्याची तक्रार नोंदविली आहे. सुनेला हाताशी धरून तिच्या माहेरच्या मंडळींनी आपल्यावर हुंडाबळी आणि घरगुती हिंसाचारासारख्या गुन्ह्यात गुंतविल्याची खंत या सासवांनी नोंदविली आहे.

सुनेच्या जाचाला कंटाळलेल्या सासवांनी थेट संघटनेशी संपर्क साधण्यासाठी फोरमने हेल्पलाईन जाहीर केली आहे. स्वत: नीना धुलिया फोन घेतात. यामध्ये ०८०-४१७०८७५७ हा लॅण्डलाईनदूरध्वनीतर०९८६८२५०९०७हामोबाईलनंबरदिला आहे. शिवाय neenadhulia@gmail.com या इमेलवरही आपण संपर्क साधू शकता.www.aimpf.org हे संस्थेचे संकेतस्थळ. या वेबसाईटवर काही प्रतिक्रिया नोंदविण्यात आल्या आहेत. त्या वाचताना संस्कार हाच कुटुंबाचा पाया असलेल्या भारतीय समाजाची वाटचाल कोणत्या दिशेने सुरू आहे याचे विदारक चित्र समोर येते. घरातील आजीला संस्था मानणारी जीवनपद्धती हीच का? अशी शंका येते. ■

### *जागतिक आरोग्य संघटना आणि मिसिंग व्हायसेस..*

*बंगळुरू येथील काही त्रस्त सासवांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'एआयएमपीएफ' संघटनेमुळे सुना आणि मुलांकडून होणाऱ्या छळाचा प्रश्न चर्चेत आला आहे.घरातील ज्येष्ठांचा छळ ही संकल्पना जागतिक आरोग्य संघटनेने पाच प्रकारांत विभागली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने प्रसिद्ध केलेल्या 'मिसिंग व्हायसेस' या अहवालात ज्येष्ठांच्या शोषणाची सविस्तर चर्चा केली आहे. या अहवालात अर्जेंटिना, ब्राझील, केनिया, लेबनॉन, कॅनडा, ऑस्ट्रिया, स्वीडन या देशांतील परिस्थितीची चर्चा केली आहे. आपण केवळ भारतातील परिस्थिती विचारात घेऊयात.*

***शारीरिक शोषण***
***मानसिक भावनिक शोषण***
***आर्थिक/स्थावर/ मालमत्ता शोषण***
***लैंगिक शोषण***
***दुर्लक्ष करणे/लक्ष न देणे***

*मानसिक, भावनिक शोषणामध्ये भावनिक आधार न देणे, दुर्लक्ष करणे, असुरक्षित वाटणे, प्रतिष्ठेचा ऱ्हास, वारंवार अपमानित करणे, टोमणे मारणे, टाकून बोलणे,हिनवणे या ना त्या पद्धतीने गरज नसल्याचे किंवा कुटुंबांवर ओझे झाल्याचे प्रदर्शित करणे,ज्येष्ठांना खाण्या-पिण्याबद्दल आवडीनिवडी नसणे, पर्यायी पदार्थ न देणे, त्यांच्या जेवणाच्या वेळा, झोपण्याच्या वेळा आणि इतर वेळांवर दुसऱ्याचे नियंत्रण राहणे, तुझं तू बघून घे, मध्ये मध्ये लुडबूड करू नको, अशा शब्दांत वारंवार खडसावणे यांसारखी निरीक्षणे जागतिक आरोग्य संघटनेने नोंदविली आहेत.*

*पुरुषांच्या तुलनेत भारतातील स्त्रियांची अवहेलना अधिक असल्याचे या संघटनेने म्हटले आहे. न कमविणाऱ्या स्त्रिया आयुष्यभर पतीवर अवलंबून असल्यामुळे त्याच्या निधनानंतर एकदम उघड्यावर येतात. त्यात वृद्धापकाळातील आजारामुळे खचून जातात. उपचार करण्यास सुनबाईकडून हेळसांड होते. वेळेवर औषध मिळत नाही. औषधी महाग असल्याचे सांगत टाळले जाते.*

*भारतामध्ये सुनांचे शोषण रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा आहे. सुनांच्या हातात या कायद्याने मोठे शस्त्र मिळाले आहे.केवळ एकट्या सुनेच्या तक्रारीवरून सासरच्या मंडळींवर तात्काळ कारवाई केली जाते. तिच्या तक्रारीतील तथ्यता तपासून पाहण्याची गरजही पोलिसांना वाटत नाही. ४९८ 'अ' हुंडाविरोधी कायदा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या कायद्याचा हेतू कितीही शुध्द असला तरी दुर्दैवाने याच कायद्याचा सासू - सासऱ्यांच्या छळासाठी हत्यार म्हणून वापर होतोय. भारतीय सुनांमधील ज्येष्ठांची काळजी घेण्याची मानसिकता लोप पावत असल्याचे 'हु'च्या अहवालात म्हटले आहे. सन २००२ च्या मिसिंग व्हाईसने नोंदविली आहेत. विशेष म्हणजे 'एआयएमपीएफ'ने 'हु'च्या या अहवालाचा हवाला दिला आहे.*